**विषय:-सन २०१८-१९ साठी ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या नवीन नोंदणीस मान्यता प्रदान करणेबाबत.**

**कृषि आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य,शिवाजीनगर पुणे-४११ ००५.**

कृआआ-२०१८/प्र.म.कृ.सिं.यो./कंनोंनुक/भाग-१/प्र.क्र.०६/१०६३/फलो-४
पुणे - ४११ ००५, दि. दि.२४/१०/२०१८

**वाचा :-** १) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना फ.नं.११-१४२/२०१५-हॉर्ट,दि.२५ ऑगस्ट,२०१७
२) शासन पत्र SSY-0318/C.R.98/14-A, दि.१५.०६.२०१८ सोबतचे प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत ६ व्या राज्यस्तरीय मान्यता समितीचे इतिवृत्त.

## आदेश

उपरोक्त वाचा येथिल (अ.क्र.२) दिनांक १५ जून,२०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत ६ व्या राज्यस्तरीय मान्यता समितीच्या दि.२५मे,२०१८ रोजी आयोजीत बैठकीच्या इतिवृतांतातील चर्चा / सूचना / निर्णय मधिल परिच्छेद ६ नुसार केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनातील अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या अधिन राहून ०४ ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या नोंदणीस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सर्वदृष्टया वैध असलेल्या व भारतीय मानक ब्युरोचे (BIS) वैध प्रमाणपत्र तसेच, जीएसटीएन व डी.आय.एन. क्रमांकाचे प्रमाणपत्र धारण करणाऱ्या ***मे.महेश कृषि उद्योग प्रा.लि., औरंगाबाद, गटनं.१४, मु.पो.भराडी, ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद-४३१११३ या ठिबक सिंचन संच उत्पादक कंपनीस नवीन नोंदणीस सन २०१८-१९ ते २०२२-२३ या पाच वर्षासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन सोबत जोडलेल्या परिशिष्ट- १ मध्ये त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या जिल्हयांमध्ये सुक्ष्म सिंचनाची कामे करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.***

**१.** सूक्ष्म सिंचन योजना अंमलबजावणीसाठी या आदेशान्वये ठिबक सिंचन संच उत्पादक कंपनीची करण्यात आलेली नोंदणी ***सन २०१८-१९ ते २०२२-२३*** या पाच (५) वर्षासाठी वैध राहिल. मात्र सदरहू कंपनीने पुढील प्रत्येक वर्षी कृषि आयुक्तालयाने विहित केलेले नोंदणी शुल्क भरुन नोंदणीचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

**२.** कृषि आयुक्तालय स्तरावर **दि.१९/११/२०१४** रोजी सूक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनी प्रतिनिधी सोबत झालेल्या बैठकीत कृषि आयुक्तालय व सूक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनी यांच्यामध्ये करावयाचा अंतिम केलेल्या करारनाम्याच्या नमुन्यामध्ये रुपये ५००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटराईज्ड करारनामा करून तो एक महिन्याच्या आत सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीने आयुक्तालयास सादर करावा.

**३.** सोबतच्या यादीत नमूद केलेल्या ठिबक सिंचन संच उत्पादक कंपनीची सन २०१८-१९ साठी नोंदणी केलेली आहे, सदर कंपनीने रु.२,००,०००/- रक्कमेची बँक गॅरंटी रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर एक महिन्याच्या आत कृषि आयुक्तालयास सादर करावयाची आहे.

***४. या आदेशान्वये नोंदणी केलेल्या कंपनीच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रत्येक घटकांच्या बीआयएस वैध मुदतीपर्यंतच त्या कंपनीची नोंदणी राहिल. बीआयएस नुतनीकरणाची कागदपत्रे विहित मुदतीत कृषि आयुक्तालयास सादर करण्याची जबाबदारी संबंधीत कंपनीची राहील. अशी कागदपत्रे वेळेत सादर न केल्यास त्या कंपनीची नोंदणी घटकनिहाय बीआयएस मुदतीच्या अंतिम तारखेनंतर आपोआप रद्द होईल.***

**५. नोंदणीस मान्यता ही विक्री पश्चात सेवा केंद्रावर नियुक्त केलेल्या मनुष्यबळांचे पीएफ नंबर अथवा पीएफ लागू नसल्यास पीएफ कार्यालयाला सादर केलेले अभिलेख मान्यता दिल्यांच्या दिनांकापासून**

**१ महिन्याच्या कलावधीत सादर करण्याच्या अधिन राहून देण्यात येत आहे.** विहीत कालावधीमध्ये पीएफ नंबर अथवा पीएफ लागू नसल्यास पीएफ कार्यालयाला सादर केलेले अभिलेख सादर न केल्यास नोंदणी मुदतीच्या अंतिम तारखेनंतर आपोआप रद्द होईल.

६. नोंदणीच्या वेळी नोंदणीकृत कंपन्यानी सादर केलेल्या दरपत्रकातील दरापेक्षा जास्त दराने, कोणत्याही घटकांची विक्री करता येणार नाही. तसेच सदरचे दरपत्रक कृषि आयुक्तालयाच्या ई-ठिबक आज्ञावलीवर नोंदणीवेळी नोंदणीकृत कंपन्यानी भरणे आवश्यक आहे. नोंदणीकृत कंपन्यांनी त्यांच्या दरपत्रकात त्या आर्थिक वर्षात वाढ किंवा घट केल्यास इ-ठिबक आज्ञावलीवर भरणे व कृषि आयुक्तालयास त्वरित कळविणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

७. मार्गदर्शक सुचनांमध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक जिल्हयात विक्रिपश्चात सेवा केंद्र उभारणी करणे व त्याबाबतची आवश्यक ती माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करुन त्यांची तपासणी करुन घेण्याची जबाबदारी संबधीत नोंदणीकृत कंपन्यांची राहील. नोंदणीस मान्यता प्राप्त होताच विक्रीपश्चात सेवा केंद्राची एक महिन्यात तपासणी करुन घेऊन त्याचा अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून सन २०१८-१९ साठी नोंदणी करण्यात येत आहे

८. नोंदणीकृत कंपन्यानी मान्यता दिलेल्या प्रत्येक जिल्हयातील त्यांच्या वितरकांची यादी नोंदणीसाठी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाकडे सादर करुन त्यांची नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे.

९. नोंदणीस मान्यता देण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या अधिकृत वितरकाने विहीत नमुन्यात साठा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदरची नोंदवही तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून प्रमाणित करणे बंधनकारक राहील. तसेच नोंदणीय मान्यता दिलेल्या कंपनीने उत्पादीत केलेल्या व वितरकांना पुरवठा केलेल्या सर्व घटकांचा घटकनिहाय अहवाल दरमहा महिना संपताच पुढील माहिन्याच्या १० तारखेपर्यत कृषि आयुक्तालयाने दि.०९ फेब्रुवारी,२०१८ रोजीच्या पत्राव्दारे विहीत केलेल्या प्रपत्रामध्ये सादर करणे आवश्यक राहील.

१०. सन २०१८-१९ साठी मार्गदर्शक सुचना कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआआ-२०१८/सुसिंयो/प्र.मं.कृ.सिं.यो./प्र.मा./प्र.क्र.५/२०१०,दि.३०.०६.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. यापुढे केंद्र, राज्य शासन, कृषि आयुक्तालय स्तरावरुन वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सुचना, अटि व शर्ती सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्या व त्यांच्या अधिकृत वितरकांवर बंधनकारक रहातील.

**सोबतः परिशिष्ट-१**

मा. आयुक्त (कृषि)
यांचे मान्यतेने.

**संचालक, फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

**प्रति,**

मे. ----------------------------------
----------------------------------
----------------------------------
----------------------------------

**प्रतिलिपी - यांना माहितीसाठी व पुढील प्रमाणे कार्यवाहीसाठी अग्रेषीत.**

**१) विभागीय कृषि सहसंचालक, सर्व**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)**

१. सन २०१८-१९ या वर्षासाठी सुध्दा जिल्हास्तरावर संबधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हातील वितरकांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी वितरक नोंदणीसाठी आवश्यक असलेले व कृषि आयुक्तालयाने विहित केलेले **शुल्क रु.२७५०/- (अक्षरी रु.दोन हजार सातशे पन्नास फक्त) ग्रासप्रणालीव्दारे /चलनाव्दारे खालील लेखाशिर्षांतर्गत भरुन घ्यावे.** तसेच रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार फक्त) रकमेची बँक गॅरंटी घेवून वितरकांची नोंदणी करावी. (ठिबक व तुषार या करीता शुल्क स्वतंत्र भरण्याची आवश्यकता नाही)

**मागणी क्र.डी.-१**
**०४०१ - पीक संवर्धन**
**८००, इतर जमा रकमा**
**(०१)(१२) इतर बाबी**
**(०४०१०४५५)**

२. संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व त्यांचे जिल्हातील सुक्ष्म सिंचन वितरक या दोघामधील कृषि आयुक्तालयाने विहित करुन दिलेल्या नमुन्यातील करारनामा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी रु.१००/-च्या स्टँम्प पेपरवर नोटराइज्ड करुन घ्यावा.

३. नोंदणीकृत कंपनीच्या जिल्हयातील विक्रिपश्चात सेवा केंद्राची तपासणी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्वत: किंवा त्यांचे अधिनस्त असलेल्या गट-अ अथवा गट-ब मधील अधिकाऱ्यांमार्फत कंपनीची कृषि आयुक्तालयस्तरावरुन नोंदणी झाल्यापासून एक महिन्याच्या आत तपासणी करुन त्यास मान्यता द्यावी.

४. वितरकाने विहित नमुन्यात साठा नोंदवही ठेवणेबाबत विहित प्रपत्र व त्याबाबतचे अदेश जिल्हास्तरावरुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी निर्गमित करावेत.

५. सन २०१८-१९ मध्ये सुक्ष्म सिंचन योजनेच्या अंमलबजावणीत कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत याची दक्षता कंपन्या त्यांचे वितरक/विक्रेते तसेच कृषि विभागाच्या अधिकारी/कर्मचा-यांनी घेणे आवश्यक आहे.

**संचालक,फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

# परिशिष्ट-१

| अ. क्र. | कंपनीचे नाव, पत्ता , संपर्क क्रमांक व इमेल | जी.एस.टी.एन. / डी.आय.एन.क्रमांक | बी.आय.एस.नोंदणीक्रमांक व त्याचा वैधताकालावधी | | | | मान्यताप्राप्त जिल्हे | वैधता कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | lateral BIS-12786 CML no. & validity | Emiiter (online) BIS-13487 CML no. & validity | Inline BIS-13488 CML no. & validity | Filter BIS-12785 CML no. & validity with brand name | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | मे.महेश कृषि उद्योग प्रा.लि.,<br>औरंगाबाद,गट नं.१४,<br>मु.पो.भराडी, ता.सिल्लोड,<br>जि.औरंगाबाद-४३१११३<br>yuvrajpatil9007@gmail.com<br>८६००४९५५५५ | 27AAJCM3463H1ZA<br>/<br>06922505<br>06922497<br>07538082 | 7500162610<br>Dt.<br>06.02.2019 | -- | 7500162711<br>Dt.<br>06.02.2019 | 7714781<br>Dt.<br>01.03.2019 | औरंगाबाद, जालना, बीड, सोलापूर, पुणे, बुलडाणा, अहमदनगर, नाशिक,वाशिम, परभणी, जळगांव (एकूण जिल्हे - ११) | सन २०१८-१९ ते २०२२-२३ |

संचालक,फलोत्पादन
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-५